पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६३ ■ शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# सेक्स स्कँडलमधील आरोपी आणि पंतप्रधानांचे नाते काय !

## एपस्टिनने ठरवली होती मोदींची अपॉइंटमेंट?

प्रतिनिधी २० डिसेंबर

**मुंबई:** अमेरिकेतील कुप्रसिद्ध 'जेफ्री एपस्टिन सेक्स स्कँडल' प्रकरणातील गोपनीय फाईल्स उघड होत असतानाच, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत अत्यंत गंभीर आणि खळबळजनक दावा केला आहे. 'एपस्टिनच्या ई-मेल्समध्ये पंतप्रधान मोदींचा उल्लेख असून, अमेरिकेतील एका बड्या अधिकाऱ्याची मोदींशी भेट घालून देण्यासाठी एपस्टिनने चक्क मध्यस्थी केली होती,' असा आरोप चव्हाण यांनी केल्याने भारतीय राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी अमेरिकेत रिलीज झालेल्या डेटाचा हवाला देत सांगितले की, 'उघड झालेल्या माहितीमध्ये काही ई-मेल्स आहेत. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार स्टीव्ह बॅनन यांनी जेफ्री एपस्टिनला एक मेल केला होता. यात बॅनन यांनी, 'मला भारताच्या पंतप्रधानांना भेटायचे आहे,' अशी विनंती एपस्टिनला केली होती. यावर एपस्टिनने, 'तुमची भेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतो,' असे उत्तर दिले. धक्कादायक बाब म्हणजे, त्यानंतर काही दिवसांनी एपस्टिनने बॅनन यांना पुन्हा मेल करून 'मोदी भेटायला तयार आहेत,' असे कळवले.'या ई-मेल व्यवहारावर बोट ठेवत पृथ्वीराज चव्हाण यांनी मोदी सरकारला प्रश्न विचारले आहेत.





मी अमेरिकेतील आणि इंग्लंडमधील वर्तमानपत्र रोज पाहतो. त्यातून होणाऱ्या चर्चेतून अमेरिकेत मोठे प्रकरण गाजतंय याची मला जाणीव झाली. त्याची आपल्याकडे कुणाला माहिती नव्हती. म्हणून मी एक डिसेंबर रोजी माध्यमांशी संवाद साधताना असे म्हटले होते की, हे प्रकरण खुले झाल्यानंतर भारताच्या राजकारणावर परिणाम होतील का? असा मी प्रश्न विचारला होता. कारण मला तसे वाटत होते. त्यावेळेला स्पष्ट पुरावा नसल्यामुळे मी कोणाची नावे घेतली नव्हती. पण आज पहिल्यांदा काही नावे घेतली, कारण त्यासंदर्भात पुरावे आलेले आहेत. त्यामध्ये बडी व्यक्ती असण्याची शक्यता आहे. त्याचा भारताच्या राजकारणावर त्याचा अमुलाग्र बदल होईल, अशी शंका बोलून दाखवली होती. त्याची खूप चर्चा झाली. देशभर ते विधान गाजले. त्यावेळी सूचित केले की, सरकारमध्ये मोठ्या पदावर बदल होऊ शकतील आणि ते बदल झाल्यावर काय होईल, याबद्दल एक विश्लेषण प्रस्तुत केले होते. त्यामुळे एपस्टिन फाईल्स ट्रान्सफरन्सी ॲक्टनुसार माहिती पुढे आलेली आहे.

### बचावासाठी 'मॉर्फिंग'चा बनाव करतील

या खुलाशांनंतर संबंधित लोक बचावासाठी पुढे येतील, असा अंदाजही पृथ्वीराज चव्हाण यांनी वर्तवला. ज्यांच्याबद्दल पुरावे सापडले, ते नाहीच म्हणणार आहे. त्या प्रकरणाशी माझा संबंध नाही. ते मॉर्फ केलेले आहेत किंवा व्हिडिओ चित्रण बदलेले आहे, असे बहाणे सांगितले जातील. शेवटी ते सर्व जनतेच्या न्यायालयात खुले होईल. आपण अशा व्यक्तींवर सरकार चालवण्याची सुत्र ठेवायची की नाही, याचा जनतेला विचार करावा लागेल, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले. या प्रकरणात अजून कॉम्प्रमाईज फोटोग्राफ्स अजून पुढे आलेले नाहीत किंवा सापडले नाहीत. आज रात्रभर अमेरिकन मीडिया आणि भारतात देखील शोध चाललेला आहे. कारण ती माहिती सर्वांना उपलब्ध आहे. त्यासाठी अमेरिकन सरकारने 'एपस्टिन फाईल्स ट्रान्सफरन्सी ॲक्ट' नावाने वेगळी वेबसाइट तयार केलेली आहे. त्या वेबसाइटवर जाऊन माहिती मिळू शकतो.

### हरदीप सिंग पुरी आणि अनिल अंबानींचेही नाव

नरेंद्र मोदींशिवाय या फाईल्समध्ये इतरही भारतीय दिग्गजांची नावे असल्याचा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. 'केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांचे नाव एका ई-मेलमध्ये आढळले आहे. तसेच एका माजी खासदार आणि प्रसिद्ध उद्योगपती अनिल अंबानी यांचेही नाव या कागदपत्रांमध्ये आहे. शिवाय अमेरिकेत राहणाऱ्या एका बड्या भारतीय वंशाच्या व्यक्तीचाही यात समावेश आहे,' अशी माहिती चव्हाण यांनी दिली.अमेरिकेत जनक्षोभामुळे 'एपस्टिन फाईल्स ट्रान्सफरन्सी ॲक्ट' लागू करण्यात आला असून, त्यानुसार काल (१९ डिसेंबर) मोठ्या प्रमाणात माहिती सार्वजनिक करण्यात आली. 'ट्रम्प यांना वाचवण्यासाठी माहिती दडपण्याचा प्रयत्न होत होता, पण कायद्यामुळे ३०० जीबी डेटापैकी काही माहिती समोर आली आहे. खासदार रो खन्ना यांनीही अजून पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आणखी स्फोटक माहिती बाहेर येण्याची शक्यता आहे,' असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## इंद्रनील नाईकांना 'कॅबिनेट' मिळण्याची शक्यता

**मुंबई:** राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. माणिकराव कोकाटेंच्या शिक्षेला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. माणिकराव कोकाटेंना फक्त दोन वर्षांची शिक्षा असल्याने त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आल्याचं कोर्टाने म्हटलं आहे. तर एकीकडे त्यांना अटकेची भीती असताना दुसरीकडे त्यांची आमदारकी देखील धोक्यात आहे.

## बाळापूर मध्ये ११.३० वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी २२.६९

प्रतिनिधी २० डिसेंबर

**बाळापूर:** नगर परिषद निवडणुकीचे शनिवार, २० डिसेंबर रोजी मतदानाला सकाळी ७.३० वाजता मतदानाला सुरूवात झाली. ७.३० ते ९.३० वा. दरम्यान ९.२५ टक्के मतदान झाले. ४०५७२ स्त्री पुरुष मतदारांपैकी ३७५१ मतदारांनी मतदान केले होते. ४३ मतदान केंद्रावर प्रक्रिया सुरू आहे. ११.३० वाजेपर्यंत ४८८० पुरुष आणि ४३२५ महिला अशा ९२०५ मतदारांनी हक्क बजावला होता. टक्केवारी २२.६९ होती.

निवडणुकीसाठी शहरातील चाळीस हजार पाचशे बाहत्तर मतदार असून, त्यामध्ये वीस हजार तीनशे एकोणसाठ पुरुष तर वीस हजार दोनशे तेरा महिला मतदारांचा समावेश आहे. बाळापूर पालिका अध्यक्षपदाकरिता पाच उमेदवार तर बारा प्रभागातील २५ सदस्यांकरिता ८५ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळ पासून शांततेत मतदान सुरू होते. रविवारी सकाळी मतमोजणी होणार आहे. खामगाव नाका परिसरात शासकीय गोदामात मतमोजणी सुरू होईल.

## नववर्षात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार 'गूड न्यूज'

### आठवा वेतन आयोगासह मिळणार तीन आर्थिक लाभ

प्रतिनिधी २० डिसेंबर

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शासन लवकरच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना तीन मोठे आर्थिक लाभ देणार आहे. राज्य शासकीय सेवेत कार्यरत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी २०२६ च्या सुरुवातीलाच काही महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारात थेट वाढ होईल.

लवकरच राज्य सरकार सातत्याने मागणी केलेले तीन आर्थिक लाभ कर्मचाऱ्यांना थकबाकीसह/ फरकासह अदा केले जाणार आहेत, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत मोठी सुधारणा होणार असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

राज्य शासनाच्या अधिकृत निर्णयानुसार, सुधारित वेतनश्रेणीचा लाभ केंद्रसरकारप्रमाणे आठवा वेतन आयोग लागू होणार असून त्याचा प्रभाव ०१ जानेवारी २०२५ पासून दिला जाणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना सातत्याने अपेक्षित असलेला हा वेतन सुधारणा निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला असून, प्रत्यक्ष लाभ महिन्याआगदी सप्टेंबर २०२८ पर्यंत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना मिळू शकणार आहे, पण थक्के व फरक नंतर निश्चितपणे दिला जाईल. यासोबतच, केंद्र सरकार प्रमाणेच महागाई भत्ता (डी.ए.) सुद्धा वाढविण्यात येणार आहे. राज्य कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्याचे दर आता ५८३ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या निर्णयानुसार जुलै २०२५ पासून हा वाढीव महागाई भत्ता लागू होऊन त्याचा थकबाकीही कर्मचाऱ्यांना दिला जाईल. यामुळे राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक फाईदा होणार आहे. तिसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे आदिवासी व नक्षलग्रस्त भागांमध्ये सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत वाघाचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी २० डिसेंबर



**यवतमाळ :** वणी ते घुग्गुस मार्गावर शिरपूर परिसरात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) कोळसा खाणीजवळ शुक्रवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाने धडक दिली. यामध्ये एका वाघाचा जागीच मृत्यू झाला. मृत वाघ सुमारे तीन ते चार वर्षांचा असून, अपघात रात्री घडला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच वणी वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांनीही तात्काळ घटनास्थळी पोहोचून प्राथमिक तपासणी केली. वाघाच्या शरीरावर धडकेच्या खुणा आढळून आल्या असून, अज्ञात वाहन चालकाविरोधात वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

हा परिसर कोळसा खाणी आणि जंगलाच्या सीमेवर असल्याने वन्यजीवांच्या वावराचे प्रमाण जास्त आहे. वाढत्या वाहनांच्या वेगामुळे असे अपघात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वनविभागाने परिसरात सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले असून, रात्रीच्या वेळी वाहनचालकांनी काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिका-यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, वन्यजीव संरक्षणासाठी रस्त्यांवर गतीरोधक व सतर्कता फलक उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## महाविकास मधून काँग्रेस बाहेर पडणार का? मनसे, शिवसेना (उबाठा )युती आली समोर

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोला:** महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेत होणारी संभाव्य युती पहाता काँग्रेस त्यांच्यासोबत जाण्याची शक्यता धूसर झाली आहे. काँग्रेस नेते महाविकास आघाडीसोबत राहतात की नाही असा प्रश्न या निमित्त चर्चिला जात आहे.

आगामी अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची एक अत्यंत महत्त्वाची व धोरणात्मक बैठक अकोला येथे संपन्न झाली.

ही बैठक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विदर्भ नेतेराजूभाऊ उंबरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडली. या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी मनसेची रणनीती, संघटनात्मक बांधणी, प्रभागनिहाय तयारी तसेच इच्छुक उमेदवारांच्या भूमिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अकोला शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या लोकाभिमुख धोरणांचा विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीस जिल्हाध्यक्ष राजेश काळे, जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, शहराध्यक्ष सौरभ भगत, शहराध्यक्ष राकेश शर्मा, जिल्हा सचिव ललित यावलकर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश फाले, मनविसे जिल्हाध्यक्ष रणजीत राठोड यांच्यासह मनसेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवार उपस्थित होते. दरम्यान, मनसेचे शिवसेनेसोबतचा घरोबा पाहता काँग्रेस महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची चिन्हं आहे.

## सीरियातील ISIS च्या तळांवर अमेरिकेचे हवाई हल्ले!

**वाशिंग्टन :** अमेरिकेने सीरियामध्ये इस्लामिक स्टेट (ISIS) विरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली आहे. अमेरिकन सैनिक आणि एका अमेरिकन नागरिकाच्या मृत्यूनंतर, ट्रम्प प्रशासनाने शुक्रवारी सीरियामध्ये आयएसआयएसच्या ठिकाणांवर प्रत्युत्तरात्मक हवाई हल्ले केले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्देशानुसार, अमेरिकन सैन्याने सीरियामध्ये इस्लामिक स्टेट (ISIS) विरुद्ध एक मोठी कारवाई सुरू केली आहे, ज्याला ऑपरेशन हॉकआय स्ट्राइक असे नाव देण्यात आले आहे. १३ डिसेंबर रोजी पालमायरा येथे झालेल्या ISIS हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी सोशल मीडियावर सांगितले की अमेरिका घ्यघ्ए कडून अमेरिकन नागरिकांच्या क्रूर हत्येला जोरदार प्रत्युत्तर देत आहे.

## खामगाव, शेगाव, जळगाव पालिकांतील नऊ जागांसाठी मतदानला सुरूवात

प्रतिनिधी २० डिसेंबर



**खामगाव :** न्यायालयीन प्रक्रिया तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित निवडणूक कार्यक्रमामुळे प्रभावित झालेल्या खामगाव, शेगाव व जळगाव जामोद नगरपालिकांतील एकूण नऊ जागा आणि देऊळगाव राजा नगर परिषदेसाठी आज शनिवार, २० डिसेंबर सकाळी ७.३० वाजता पासुन मतदानास सुरुवात झाली आहे, तर सायंकाळी ठरलेल्या वेळेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू राहणार आहे. मतदानानंतर रविवार, २१ डिसेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार असून, त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे संबंधित नगरपालिका क्षेत्रातील उमेदवारांच्या राजकीय भवितव्याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

खामगाव नगरपालिकेतील चार जागांसाठी दहा उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यासाठी शहरातील १८ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून, पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. या निवडणुकीचा प्रचार शुक्रवार, १९ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता थांबविण्यात आला. प्रचार संपल्यानंतर उमेदवारांनी मतदारांशी वैयक्तिक संपर्क साधत शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले.

## मुंबईतून पहिला कंटेनर झाला रवाना

प्रतिनिधी २० डिसेंबर

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषिमालाला देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही योग्य आणि स्पर्धात्मक दर मिळावा, यासाठी महाराष्ट्राची पणन व्यवस्था अधिक आधुनिक आणि सक्षम करण्यात येणार आहे , अशी ठाम भूमिका राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली . महाराष्ट्रात या हंगामात उत्पादित झालेल्या डाळिंबाचा पहिला कंटेनर जेएनपीटी (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट) बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेकडे रवाना झाल्याच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

हा डाळिंबाचा कंटेनर नवी मुंबईतील वाशी येथे असलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रातून पाठविण्यात आला. या सुविधेमुळे निर्यातक्षम फळांवर आंतरराष्ट्रीय दर्जानुसार प्रक्रिया करून त्यांची गुणवत्ता टिकवली जाते. रावल यांनी सांगितले की, आंबे, डाळिंब तसेच इतर फळे आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेली मेहनत जागतिक बाजारपेठेत योग्य मूल्यात विकली जावी, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ तसेच केंद्र शासन समन्वयाने काम करत आहे.

### उत्पन्नात २० ते ३० टक्क्यांनी वाढ होणार

भारतीय डाळिंबांचा अमेरिकन बाजारपेठेतील वाटा वाढल्यास राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. याचा थेट फायदा महाराष्ट्रातील सोलापूर, नाशिक, सांगली, पुणे आणि अहमदनगर या डाळिंब उत्पादनासाठी प्रसिद्ध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे निर्यात वाढ ही केवळ व्यापारी संधी न राहता शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग ठरणार आहे.

### निर्यात का थांबली होती?

२०१७-१८ या कालावधीत काही तांत्रिक अडचणींमुळे भारतातून अमेरिकेला डाळिंब निर्यात थांबवण्यात आली होती. परिणामी, जवळपास सहा वर्षे भारतीय डाळिंब अमेरिकन बाजारपेठेपासून दूर राहिले. मात्र, ही निर्यात पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने तसेच राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. अमेरिकेच्या कृषी विभागाशी सातत्याने तांत्रिक आणि प्रशासकीय स्तरावर चर्चा करून आवश्यक चाचण्या घेण्यात आल्या आणि त्यानंतर विकिरण सुविधा केंद्राचे अहवाल सादर करण्यात आले.



## आता जि. प., पं. स. उमेदवारांना कोर्टात दाद मागता येणार नाही!

प्रतिनिधी २० डिसेंबर

**मुंबई :** राज्यात सध्या महापालिका निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक पार पडण्याची चिन्हे आहेत. मात्र, त्याआधीच एका निर्णयाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठीच्या इच्छुक उमेदवारांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एखाद्या उमेदवाराचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने फेटाळल्यास तो निर्णय अंतिम मानण्यात येणार आहे.

## यवतमाळात ईव्हीएम बिघाड; मतदान काही वेळ थांबले

### नगराध्यक्ष-नगरसेवकांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद

प्रतिनिधी २० डिसेंबर

**यवतमाळ** :यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी नऊ उमेदवार रिंगणात असून, २९ प्रभागांमध्ये ५८ नगरसेवक पदांसाठी २९९ उमेदवार मैदानात आहेत. शनिवारी सकाळपासून शहरातील २४८ मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान सुरु झाले आणि सर्व उमेदवारांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद झाले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी थेट मतदान करणाऱ्या २,३२,३१५ मतदारांच्या हातात निर्णय असून, अध्यक्षपदासह ५८ नगरसेवकांचे नशीब ठरवले जाणार आहे. यवतमाळसह जिल्ह्यातील दिग्रस, पांढरकवडा, वणी, आर्णी, दारव्हा, पुसद, घाटंजी, उमरखेड आणि नेर-नबाबपूर या नगरपरिषदांसाठी ही मतदान आज पार पडले. मतदानाच्या दिवशी प्रभाग क्रमांक २७ मधील ध्रुव प्राथमिक शाळा, खोली क्रमांक ५ मध्ये ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड निर्माण झाला. यामुळे सुमारे वीस मिनिटे मतदान थांबले आणि मतदारांची मोठी रांग उभी राहिली. प्रशासनाचे कर्मचारी ताबडतोब घटनास्थळी पोहोचले असून, ईव्हीएम दुरुस्ती किंवा पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न सुरू आहे.



CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
शनिवार, दि.२० डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि त्यांच्या अधिपत्याखालील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये 'लिपिक टंकलेखक (गट-क)' या संवर्गातील एकूण ७२ रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात येत असून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या भरती प्रक्रियेत महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिक तसेच शासन निर्णयानुसार युद्ध काळात किंवा शांततेच्या काळात सैनिकी सेवेत कार्यरत असताना शहीद झालेल्या किंवा अपंगत्वामुळे नोकरीसाठी अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसदाराला पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. एकूण ७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार व गुणवत्तेनुसार ही निवड केली जाणार आहे.

# पोटे अभियांत्रीकीच्या संगणक विज्ञान व अभियांत्रीकी व आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विद्यार्थ्यांची इंडस्ट्री भेट

प्रतिनिधी २० डिसेंबर




**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी (CSE) तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स (AI & DS) विभागातील विद्यार्थ्यांनी नुकताच इन्फोसेप्ट (InfoCepts Technologies Pvt. Ltd.), नागपूर येथे शैक्षणिक उद्योग भेट दिली.

या उद्योग भेटीत संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागातील ३० विद्यार्थी तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विभागातील १८ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना आयटी उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व व्यावसायिक वातावरणाची सखोल माहिती मिळाली.

इन्फोसेप्ट कंपनीतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रक्रिया व करिअर संधी याविषयी मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या उद्योग भेटीचे प्रमुख (Tour Incharge) म्हणून प्रा. एम. के. निचत (संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग) व प्रा. एस. एस. सगणे(आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स) यांनी जबाबदारी पार पाडली. सदर उपक्रमाला संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. विजय गडिचा तसेच आर्टीफिशीअल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विभागप्रमुख डॉ. अजय गडिचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

अशा उद्योग भेटींमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व उद्योगाभिमुख शिक्षणास चालना मिळते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी इन्फोसेप्ट व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले.

# महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांचे प्रलंबित अर्जावर तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अमरावती :** राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत (महाआयटी) यांचेकडून विकसित करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून विविध मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सन २०१९-२० ते २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज मोठया प्रमाणात विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. त्यावर तात्काळ कार्यवाही करुन अर्ज सादर करण्याच्या सूचना समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपआयुक्त माया केदार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केल्या आहेत.

महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीतील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर मोठया प्रमाणात अर्ज प्रलंबित आहेत. विविध स्तरावरील प्रलंबित असलेले शिष्यवृत्ती अर्ज विहित कालावधीत निकाली काढण्याबाबत शासन, आयुक्तालय, प्रादेशिक कार्यालय आणि जिल्हा कार्यालयामार्फत विद्यार्थी व महाविद्यालयांना अवगत करण्यात आलेले आहेत. तसेच जिल्हा कार्यालयाकडून संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना वारंवार लेखी स्वरूपात कळविण्यात आलेले आहे. तसेच सोशल मिडियाचे व वृत्तपत्रांमधून सुद्धा जाहीर आवाहन करण्यात आले आहे. केंद्र शासनाने भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीतील महाडीबीटी प्रणालीवरील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्याकरिता सर्व राज्यांना दि.३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंतची अंतिम मुदत दिलेली होती. तसेच सदरील मुदतवाढ दि.३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत वाढविण्यात आली होती. तरी सुद्धा विद्यार्थी व महाविद्यालय यांचे कडून प्रलंबित अर्जाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. सन २०१९-२० ते २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी प्रणालीवर विविध मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज सन २०१८-१९ प्रमाणे Admin कडून Auto Reject करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# स्केटिंग स्पर्धेत अद्विक बारंगेची दमदार भरारी

प्रतिनिधी २० डिसेंबर

## ◆ दोन सिल्वर, एक ब्रॉंझ मेडल पटकावून राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश

**अमरावती :** परमानंद स्पोर्ट्स अकॅडमी, नाशिकच्या येथे आयोजित राज्यस्तरीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५- २६ मध्ये अमरावतीच्या अद्विक उज्वल बारंगे याने दोन सिल्वर आणि एक ब्रॉंझ मेडल प्राप्त करीत अमरावतीचे नाव रौशन केले आहे.




रोलर स्पोर्ट्स आणि कोचेस फेडरेशन ऑफ इंडिया द्वारा संचालित महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रोलर स्पोर्ट्स अँड कोचेस (एमएआरएससी) च्या वतीने ही रोलर स्केटिंग स्टेट चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. अद्विक हा शहरातील प्रसिध्द रेडिओ फ्रिक्वेन्सी लेझर सर्जन डॉ. उज्वल आणि डॉ. वैशाली बारंगे यांचा मुलगा असून तो नारायणा विद्यालयाचा चौथीचा विद्यार्थी आहे. ष

आठ ते दहा वर्षे वयोगटातील राज्यस्तरीय स्पर्धेत उत्तम खेळाचे प्रदर्शन करत अद्विकने राष्ट्रीय स्पर्धेत आपले स्थान पक्के केले आहे. आजवर विविध रोलर स्केटिंग स्पर्धेत अद्विकने १७ पदके प्राप्त केली आहेत, हे विशेष. तो आपल्या यशाचे श्रेय प्रसाद रोलर स्केटिंग अकॅडमीचे संचालक प्रसाद जोशी, मार्गदर्शक मिलिंद सराफ, नारायणा विद्यालयाचे प्राचार्य सचिन भेलकर आणि क्रीडाशिक्षक क्षितिज मोहोड यांना देतो. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आंतरराष्ट्रीय एआय परिषदेचे उद्घाटन संपन्न

प्रतिनिधी २० डिसेंबर

## ◆ डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अमरावती:** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे 'सामाजिक विकासासाठी एआय नवकल्पना' (ICAIISD-2025) या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज संपन्न झाले.

प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांनी बुद्धिमत्तेच्या (AI) माध्यमातून संशोधन आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हाच या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या परिषदेमुळे शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग जगतातील दुवा अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांना




जागतिक संशोधनाची दिशा समजण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'बुक ऑफ ॲबस्ट्रॅक्ट'चे प्रकाशन करण्यात आले.

समीर सावरकर यांनी आरोग्य क्षेत्रात एआयच्या भूमिकेबाबत सांगितले की, ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी एआय आधारित स्क्रीनिंग तंत्रज्ञान क्रांतिकारी ठरू शकते. तसेच, एसीएम नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष रविंद्र केसकर यांनी संशोधनातील डेटा विश्लेषणाचे महत्त्व विशद केले. तर डॉ. निरंजन जोशी यांनी अभियंत्यांनी तांत्रिक ज्ञानासोबत सामाजिक जबाबदारीचे भान ठेवण्याचे आवाहन केले. परिषदेतील मुख्य आकर्षण ठरलेल्या विशेष सत्रात आयआयएससी बंगळुरूचे प्रा. डॉ. फणिंद्र कुमार यलवर्थी यांनी 'डिजिटल हेल्थ'वर मार्गदर्शन केले. त्यांनी आरोग्य क्षेत्रातील एज कम्प्युटिंग, थ्री-डी संकल्पना आणि एआय समोरील आव्हाने याविषयी माहिती दिली. आयोजन समितीचे समन्वयक डॉ. शंतनु लोही यांनी आभार मानले.

# कांदा व लसून साठवणूक गृहासाठी अर्थसहाय्य

प्रतिनिधी २० डिसेंबर

## ◆ शेतकऱ्यांनी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती :** राज्यात कांदा पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवून ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्य गुणवत्ता राखली जाऊन शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. यामुळे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये कमी खर्चाचे कांदाचाळ/लसूण साठवणूक गृह हा घटक राबविण्यात येत असून ५ ते २५ मे.टन, २५-५०० मे.टन व ५००-१००० मे.टन क्षमतेच्या कांदा चाळी/लसूण साठवणूक गृह उभारणीसाठी इच्छुक शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक अशोक किरन्नळी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

कांदा पिकांचे साठवणूकीत होणारे नुकसान कमी करणे, कांदा पिकाची हंगामामध्ये आवक वाढून कांद्याचे भाव कोसळणे तसेच हंगामाव्यतिरिक्त कांद्याचा तुटवडा निर्माण होऊन भाव वाढणे अशा समस्येवर अंशत: नियंत्रण मिळविणे आदी योजनाचा उद्देश आहे.

**प्रकल्पखर्च व अनुज्ञेय अनुदार मर्यादा पुढीलप्रमाणे :** या योजनेअंतर्गत सर्वसाधारण व अनुसूचित क्षेत्राकरीता ५ ते १००० मेट्रिक टन क्षमतेच्या कांदाचाळ / लसूण साठवणूक गृहासाठी अनुदान देण्यात येणार आहे.

तसेच एकुण भांडवली खर्चाच्या ५० टक्के अनुदान प्रमाणे देय राहील. १) ५ ते २५ मे.टन क्षमतेच्या रु आठ हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल चार हजार प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल. २) २५ ते ५०० मे.टन क्षमतेच्या रु सात हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल तिन हजार पाचशे प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल. ३) ५०० ते १००० मे.टन क्षमतेच्या रु सहा हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल तिन हजार प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल. उपरोक्त सदर प्रकल्पाचा एकूण खर्च ३० लाखांपेक्षा अधिक झाल्यास बँक कर्ज घेणे अनिवार्य असून अनुदानाची रक्कम ही बँक कर्जाच्या परतफेडीच्या स्वरूपात देण्यात येणार आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अमरावती:** देशातील आघाडीची सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ११५व्या वर्धापन दिनानिमित्त अमरावती क्षेत्रीय कार्यालयाने 'सेवा ही संकल्प' ही संकल्पना राबवत वर्धापन सप्ताह साजरा केला. १५ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या सप्ताहात बँकेने नफ्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे उत्तम उदाहरण समोर ठेवले आहे.

या उपक्रमाचा मुख्य भाग म्हणून क्षेत्रीय प्रमुख सुनील पांडेय यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या अधिकाऱ्यांनी वलगांव येथील श्री संत गाडगे महाराज परमधाम वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी बँकेच्या वतीने वृद्धाश्रमासाठी प्रवेशद्वाराची कमान, फूड ट्रॉली आणि सुका मेवा प्रदान करण्यात आला. बँकेतील अधिकाऱ्यांनी आपल्या वैयक्तिक वर्गणीतून किराणा माल, फळे आणि ४ सीलिंग फॅनची भेट देऊन वृद्धाश्रमातील सोयी-सुविधांमध्ये भर घातली.

बँकेचा हा सेवायज्ञ केवळ वृद्धाश्रमापुरता मर्यादित न राहता, अमरावती येथील अपंग कल्याण संस्थेलाही १० सीलिंग फॅन भेट देण्यात आले.

# स्पर्धा परिक्षेची तयारी करताना अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करावे -सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अमरावती:** केंद्रीय आणि राज्य शासनात सेवेमध्ये रूजू होण्यासाठी स्पर्धा परिक्षा हा मार्ग आहे. यात प्राथमिक चाचणी, मुख्य परिक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यातून निवड केली जाते. या परिक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करावे, असा सल्ला वाशिम येथील सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा यांनी दिला.

जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा आणि उपजिल्हाधिकारी सुनिल टाकळे यांचे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी सहायक जिल्हाधिकारी कौशल्या एस., सहायक आयुक्त विकास खंदारे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, ग्रंथालय सहायक संचालक राजेश पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२४च्या परिक्षेत २०वा क्रमांक पटकाविलेले आकाश वर्मा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. श्री. वर्मा यांनी, परिक्षा देण्यामागील उद्देश काय आहे, याचा विचार करून ही परिक्षा द्यावी. परिक्षा देण्याची संधी ही प्रत्येकाला असल्याने शासनात काम करण्याची संधी प्राप्त होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमुळे देशपातळीवर तसेच देशाबाहेरही सेवेची संधी प्राप्त होते. या परिक्षांची तयारी करीत असताना प्रामुख्याने अभ्यासक्रमावर लक्ष्य केंद्रीत करणे आवश्यक आहे. परिक्षांमध्ये काही प्रश्न हे अत्यंत कठिण असतात. त्यावेळी दिलेल्या पर्यायापैकी कोणते उत्तर योग्य राहिल, याची पडताळणी केल्यास मार्क वाढविण्यास मदत होईल. प्रामुख्याने राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, चालू घडामोडी या विषयांचा प्रामुख्याने अभ्यास करावा. परिक्षांमध्ये वेळेचा सदुपयोग आणि यश मिळविण्यासाठी चाचणी परिक्षा देणे आवश्यक आहे. यामुळे परिक्षेचा सराव होण्यास मदत मिळते. निबंध लिहिताना दिलेल्या विषयाला न्याय देणे गरजेचे आहे. यासाठी भारतीय संविधान, चालू घडामोडी आणि इतर साहित्याचा उपयोग होऊ शकतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# लोणार सरोवरातील पाण्याच्या पातळीत सातत्याने वाढ !

प्रतिनिधी २० डिसेंबर

## ◆ कमळजा देवीचे मंदिर १५ फुट पाण्यात

**बुलढाणा :** महाराष्ट्र राज्यातील लोणार सरोवर हे बुलढाणा जिल्ह्यातले खाऱ्या पाण्याचे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर आहे. याची निर्मिती फार वर्षापूर्वी एका उल्कापातामुळे झाली. लोणार सरोवर हे बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे आघाती सरोवर (विवर) आहे. या विवरचे पाणी अल्कधर्मी आहे. लोणार सरोवराच्या जतनासाठी व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. तसेच या परिसरात अंदाजे बाराशे वर्षांपूर्वीची जुनी मंदिरे आहेत. त्यातील १५ मंदिरे सरोवरात (विवरात) आहेत. तर काही आणखी मंदिरे आजूबाजूच्या परिसरात आहेत. मात्र गेल्या सहा



महिन्यापासून खाऱ्या पाण्याच्या लोणार सरोवरातील पाण्याच्या पातळीत प्रचंड वाढ होताना दिसत असल्याने चिंतेची बाब निर्माण झाली आहे.

तब्बल ५२ हजार वर्षांपूर्वी उल्कापात निर्मित खाऱ्या पाण्याच्या लोणार सरोवरात मागील काळात मासे आढळून आली त्यावर बरीच चर्चा झाली. दरम्यान सरोवरात चारही बाजूने असंख्य हेमांडपंथी मंदिरे आहेत. त्यात कमळजा देवीचं मंदिर भाविकांचं श्रद्धास्थान आहे, हे मंदिर कधीच पाण्याखाली गेले नाही मात्र यावेळेला हे मंदिर १५ फुट पाण्यात गेले आहे. त्यामुळे लोणार खाऱ्या पाण्याचे सरोवर पुन्हा चर्चेत आले आहे. सरोवरातील पाण्याच्या पातळीत का वाढ होत आहे? याचा अद्याप पर्यंत शोध लागला नाही. विदेशातून असंख्य पर्यटक, शास्त्रज्ञ अभ्यासासाठी लोणार येथे येत असतात मात्र खाऱ्या पाण्याच्या सरोवरात मासे का आढळत आहे? व पाण्याच्या पातळीत का व कुठून वाढ होत आहे? हे अद्याप अस्पष्ट आहे. यावर संशोधन होणे गरजेचे आहे.

# एसडीपीओ पथकाने पकडलेला ५०० कट्टे तांदूळ रेशनचाच

प्रतिनिधी २० डिसेंबर

**खामगाव:** उपविभागीय पोलिस अधिकारी पथकाने संशयास्पदरीत्या पकडलेला तांदूळ हा रेशनचाच असल्याचे तहसीलदारांच्या चौकशी अहवालातून स्पष्ट झाले. खामगाव ग्रामीण पोलिसांनी चालक व त्याच्या सहायका विरोधात जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात वळवण्याच्या या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

खामगाव ग्रामीण पोलिसांनी १० डिसेंबर रोजी रात्री (क्र. एमएच १९ झेड ५१२८) ट्रक संशयास्पदरीत्या तांदूळ वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचून तो अडवला. तपासात ट्रकमध्ये ५०० कट्टे, म्हणजेच २४५ क्विंटल तांदूळ आढळून आला. जप्त मालाची बाजार भावानुसार किंमत असून, ट्रक ही ताब्यात घेण्यात आला होता. दरम्यान, पकडलेला तांदूळ रेशनचा असल्याचा संशय बळावल्याने उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाकडून खामगाव तहसीलदारांशी पत्रव्यवहार करण्यात आला. तहसीलदार सुनील पाटील यांच्या चौकशी अहवालानंतर पुरवठा निरीक्षक रामराव महादेव ठाकरे यांनी हा तांदूळ शासकीय रेशनचा असल्याचा अहवाल खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात सादर केला. त्यानुसार शुक्रवारी रात्री उशिरा तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून या प्रकरणी चालक गोविंदा गोपाळराव मार्कड (४९, रा. नांदुरा) व सहायक योगेश जानराव डाबेराव (२५, रा. पारस, जि. अकोला) यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय नीलेश लबडे, सुधाकर थोरात तसेच विशाल कोळी व पवन मोरे यांच्या पथकाने ही कारवाई केली होती.

# नायलॉन मांजाची विक्री गुन्हा दाखल

प्रतिनिधी २० डिसेंबर

**खामगाव:** शेगाव शहरातील आळसना रोडवरील आझादनगर परिसरात नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या एका दुकानावर शहर पोलिसांनी १८ डिसेंबर रोजी कारवाई केली. या प्रकरणी संबंधित दुकानदारा विरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व वापरावर बंदी घालण्याचे सक्तीचे आदेश दिले असून, त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. आगामी मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शेगाव शहरात नायलॉन मांजाची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने आझादनगर येथील दुकानावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत आरोपी मोहमंद आसीफ मोहमंद रफीक (वय ४३, रा. आझादनगर, शेगाव) याच्याकडून नायलॉन मांजा जप्त करण्यात आला आहे.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# नगरपरिषद मतमोजणी दरम्यान वाहतूक वळवणार

वि. प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोटः** नगरपरिषद निवडणूक-२०२५ ची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी ट्रायसेम सभागृह क्र.२, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पोपटखेड रोड, अकोट येथे होणार आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अकोट-पोपटखेड रोडवरील वाहतूक वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

अकोटहून पोपटखेडकडे जाणारी वाहतूक जुना बोर्डी रस्ता–ग्रामीण रुग्णालय मार्गे, तर पोपटखेडहून अकोटकडे येणारी वाहतूक मोहाळा–अकोलखेड मार्गे अंजनगाव रोडने वळविण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## कानशिवणीत होमिओपॅथी उपचार शिबीर संपन्न



प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोला:** कानशिवणी येथील श्री गोपाल कृष्ण गोसेवा केंद्रात नुकतेच भव्य होमिओपॅथी द्वारा समूळ रोग उच्चाटनसाठी मोफत होमिओपॅथी औषधोपचार शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा प्रारंभ पु.फलाहारी महाराज, हभप भक्तराज महाराज, हभप प्रमोद महाराज, पंढरपूर, डॉ. संजय राऊत, प्रा. सुभाष राऊत, विनायक शेळके, गोसेवा केंद्राचे सर्वसेवाधिकारी प्रकाश वाघमारे आदींच्या उपस्थीतीत करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी स्व.डॉ.प्रफुल्ल विजयकर व डॉ. सॅम्युअल हनिमन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप पूजन केले. यावेळी डॉक्टरांच्या चमुने श्री सप्त गोमाता प्रदक्षिणा मंदिरातील श्री राधाकृष्ण यांची पूजा करून सर्व गोमाताना हिरवा चारा देऊन पूजन केले. या शिबिरात डॉ. संजय राऊत, डॉ.सौ. शिल्पा राऊत, डॉ. सौ. राधा पारसकर, डॉ. तुषार मालोकार, डॉ. अनुराग पांडे, डॉ.महेश म्हैसने, डॉ.प्रविण वराडे, खामगाव व डॉ. कु. कल्याणी राऊत यांचा गौ माता - राधा कृष्ण यांचा आकर्षक फोटो व पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## बालकांसाठी दोन दिवसीय मोफत नेत्र तपासणी शिबीर

**अकोला :** येथील गादीया आय आरोग्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ख्रिसमस निमित्त बालकांसाठी दोन दिवसीय मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

जवाहरनगर रोडवरील ॲक्सीस बँकेसमोर असलेल्या गादीया आय आरोग्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २५ आणि २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते रात्री ७ वाजे दरम्यान बालकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. शिशू नेत्ररोग तज्ञ डॉ. कल्याणी मळसने गादीया या शिबिरात ० ते १५ वयोगटातील मुलामुलींची तपासणी करणार आहेत. या शिबिरात सहभागी बालकांना ख्रिसमस निमित्त सरप्राइज गिफ्ट सुध्दा देण्यात येणार आहेत. या शिबिरात सहभागी होण्यासाठी ८६६८५४४६९३ या मोबाईल क्रमांकावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

# अकोट येथे महिला शिक्षिकांसाठी कार्यशाळा



प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोला:** बालविवाहमुक्त भारत संकल्प अभियान १०० दिवस व बेटी बचाव बेटी पढाव या उपक्रमात अकोट येथील विद्यांचल द स्कूल या शाळेत अकोट तालुक्यातील महिला शिक्षिकांसाठी महिला बालके यांच्याशी संबंधित कायद्याची माहिती देण्यासाठी कार्यशाळा मंगळवारी झाली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रोशनी बन्सल यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्राचार्य शैलजा त्रिवेदी अध्यक्षस्थानी होत्या. ॲड. नितेंद्र उंबरकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, प्रांजली जैस्वाल, शुभांगी लाहुडकर, डॉ.प्रीती कोगदे, मधुकर सूर्यवंशी, ॲड. मनिषा भोरे, पीएसआय वैभव तायडे उपस्थित होते. बाललैंगिक अत्याचार अधिनियम, कामाचे ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण अधिनियम, बालविवाह अधिनियम, बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, सायबर सुरक्षितता, कौटुंबिक हिंसाचार अधिनियम, तसेच महिलांचे कायदे, महिला व बालविकास विभागाच्या विविध योजना याबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. कायदेविषयक पुस्तिकेचे वितरणही यावेळी झाले. तालुक्यातील ४१० महिला शिक्षिका सहभागी होत्या. श्री. पुसदकर यांनी प्रास्ताविक केले. अनिता देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. रुपाली साबळे यांनी आभार मानले. गजानन सावरकर, साधना वाघोडे, महेंद्र काकड , वंदना नाथे , लता डांबरे यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडुलकर, प्रिया इंगळे, महेंद्र गनोदे राम चतुरकर उपस्थित होते.

# मतमोजणीकरिता यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी २० डिसेंबर



**मुर्तिजापूर :** नगर परिषद निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया २१ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. या करिता प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज झाली आहे. एकूण १२ प्रभागाची व नगराध्यक्षपदाची मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असून या करिता एकूण ९२ अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. एकूण ६ टेबल वर मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. सहा टेबल करिता प्रभाग निहाय मतमोजणी प्रक्रिया होणार असून या मध्ये एकूण सहा टेबल वर १२ फेरी मध्ये मतमोजणी होणार असून सदस्य पदाकरीता प्रभाग निहाय मतमोजणी होणार असून एका फेरीत एका प्रभागाचा निकाल घोषीत होणार आहे तसेच या निकाल सोबत नगराध्यक्ष पदा करिताची मतमोजणी प्रक्रिया फेरीनिहाय सुरू ठेऊन एकूण १२ फेरी अंती नगराध्यक्ष पदाची मतमोजणी होऊन बाराव्या फेरी अंती त्याची निवड घोषणा होणार आहे. ज्या प्रभागाची मतमोजणी सुरू असेल त्याच प्रभागातील मतमोजणी प्रतिनिधी यांना प्रवेश राहील. मा जिल्हाधिकारीं अकोला यांचे आदेशानुसार मतमोजणी परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. मतमोजणी प्रक्रिया करिता सहा मतमोजणी पर्यवेक्षक व त्यांना मदती करीता सहा मतमोजणी सहाय्यक चार राखीव अधिकारी कर्मचारी असे एकूण १६ कर्मचारी यांची नेमणूक निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी केली असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश जाधव यांनी दिली. सकाळी १० वाजता प्रत्यक्ष मतमोजणी प्रक्रिया सुरू होणार असून माहिती व प्रसारण होण्याचे दृष्टीने स्वतंत्र मीडिया कक्ष स्थापन करण्यात येणार असून यामध्ये सर्व पत्रकार बंधू यांचे बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक पोलिस यंत्रणा सज्ज करण्यात आली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, पोलिस निरीक्षक अजित जाधव यांनी दिली.

# उमेदवारांना लागली उद्याच्या निकालाची उत्सुकता

♦ २१ डिसेंबरला उघडणार २१ विजेत्यांचे भाग्य



प्रतिनिधी २० डिसेंबर

**हिवरखेड :** नगरपरिषद निवडणूक २, डिसेंबरला पार पडली होती, त्याचा निकाल ३ डिसेंबरला लागणारच होता, तर कोर्टाने इतर नगरपरिषद निवडणूक सोबतच निकाल जाहीर करण्याचे आदेश दिले होते, त्या आदेशाची तारीख २१ डिसेंबर रोजी असून ती उद्या रविवारची आहे , निवडणूक आयोगाचे कर्मचारी मतमोजणी करण्यास सज्ज झाले आहेत, ही मतमोजणी हिवरखेड खरेदी विक्री कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ सकाळी १० वाजता पासून सुरू होणार असल्याचे निवडूक आयोगाने असे जाहीर केले आहे. ईव्हीएम मशीन उघडल्या नंतर कोणत्या राजकीय नेत्यांचे भाग्य उजळते हे पाहणे औसुक्याचे ठरेल.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडून विविध कृषी प्रकल्पांची पाहणी

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोलाः** जिल्ह्यातील विविध कृषी प्रकल्प, कृषी योजनाधारित व्यवसाय प्रकल्प आदींची जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गुरुवारी पाहणी केली.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी कुंभारी येथे राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन व इतर गळीतधान्य प्रकल्पाअंतर्गत शेत बांधावरील जैविक निविष्ठा प्रयोगशालेला भेट देऊन पाहणी केली.

तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनाअंतर्गत फळबाग लागवडीची पाहणी केली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे , प्रकल्प संचालक आत्मा मुरली इंगळे , उप विभागीय कृषी अधिकारी विवेक बिऱ्हाडे , तालुका कृषी अधिकारी विलास वाशीमकर उपस्थित होते.



**बोदडे डेअरीला भेट**

जिल्ह्यातील मौजे वणी रंभापूर तालुका अकोला येथील बोदडे डेअरीला जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी भेट दिली. डेअरी चे व्यवस्थापक मयूर बोदडे यांनी कृषि विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत अर्ज लाभ घेतला असून स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बोरगाव मंजू या बँकेमार्फत त्यांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे, या योजनेंतर्गत त्यांना प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के अनुदान रक्कम ३ लक्ष ८५ हजार रु मिळाले आहे.

दुग्ध प्रक्रिया उद्योगासाठी श्री. बोदडे यांनी आधुनिक मशिनरीज खरेदी केल्या असून सदर मशिनरीज च्या सहायाने ते त्यांच्या डेअरी मध्ये लस्सी, दही, पेढा, श्रीखंड इत्यादी दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करतात, तसेच विशेष पॅकिंग मध्ये उत्पादित माल जिल्ह्यातील विविध ठिकाणी विक्री करतात. जिल्हाधिकारी यांनी उत्पादनाच्या ठिकाणाची, यंत्रसामुग्री तसेच उत्पादित मालाच्या गुणवत्तेची पाहणी केली आणि उद्योजकाच्या कार्याचे कौतुक केले.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक; राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसोबत बैठक



प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोलाः** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५-२६ करीता मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे प्राप्त आदेशानुसार अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक बाबत टप्पे निहाय कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला असून आज दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे त्यांच्या दालनात निवडणूक कार्यक्रमाबाबत अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात आलेल्या तयारी बाबत व त्या अनुषंगीक सोयी सुविधाबाबत स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात्तील विविध राजकीय पक्षांसोबत बैठक संपन्न झाली आहे. या बैठकीत माजी महापौर विजय अग्रवाल, महानगर अध्यक्ष भाजप जयंत मसने, आप पार्टीचे प्रदीपकुमार गवई, कॉंग्रेस पक्षाचे महेंद्र गवई, शिवसेनाचे अश्विन नवले, मनसेचे पंकज साबळे, एआयएमआयएमचे जावेद खान पठाण, आसिफ अहमद खान, आयएसएसचे मो.एजाज मो. ताहेर, व्हीबीएचे अजहर खान, समाजवादी पार्टीचे इब्राहिम खालिक, राष्ट्रवादी पार्टीचे (अजित पवार) शंकर कंकाळ, सम्राट अशोक सेनाचे आकाश शिरसाट आदींची उपस्थिती होती.

# तक्रारीच्या निराकरणासाठी असलेल्या कालमर्यादेचे उल्लंघन

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोलाः** कुठल्याही शासकीय अथवा स्थानिक संस्थेमध्ये दाखल होणाऱ्या तक्रारोच्या निपटाऱ्यासाठी शासनाने कालमयदिवे बंधन घातले असले तरी अतिक्रमण हटविण्यासंबंधी शहर महानगरपालिकेत दाखल झालेल्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी शहर महानगरपालिकेकडून या कालमयदिचे उल्लंघन झाले असल्याचा आरोप केल्या जात असून २०२३ पासून अतिक्रमण हटविण्यासंबंधात सातत्याने कौलखेड येथील पोस्टल कॉलनी भागातील अतिक्रमण हटविण्यासंबंधात कौलखेड

येथील विसावा सोसायटीमधील नागरीक तक्रारी करत आहेत. या परिसरातील पोस्टल कॉलनीमध्ये ३० फुटाचा रस्ता फक्त ८ फुट राहीला आहे. रस्त्याची २२ फुट जागा अतिक्रमणकर्त्यांनी व्यापली आहे. ९ फेब्रुवारी २०२३ पासून आतापावेतो ५ तक्रारी या शहर महानगरपालिकेत करण्यात आल्या असून आमदार, खासदार, नगर विकास मंत्रालय यांच्याकडे तक्रारीच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. परंतु फेब्रुवारी २०२६ अवघ्या काही महिन्यांवर येवून ठेपला आहे. तक्रारी दाखल करण्यास तीन वर्षाचा कालावधी पूर्ण होत असला तरी अद्यापही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे तक्रारीच्या निपटाऱ्यासाठी आणखी किती कालमर्यादा हवी हे महापालिका आयुक्त व अतिक्रमण विभाग यांनी जाहिर करावे अशी तक्रारकर्त्या नागरीकांची मागणी आहे. अतिक्रमण केलेल्या २२ फुट रस्त्यावर कोणी गोठा बांधला, कोणी फेन्सिंग केले, कोणी पक्के बांधकाम केले तर कोणी जागा अडवून ठेवली. उरलेल्या ८ फुट रस्त्यावर दुचाक्या उभ्या राहत असल्यामुळे नागरीकांना या रस्त्यावरुन वाट काढतांना कमालीचा मनःस्ताप होत आहे. अकोल्यातील पदपथ अगोदरच अतिक्रमणकर्त्यांनी गिळंकृत केले आहे. आत्ता रस्तेही गिळंकृत होऊ लागल्यामुळे तक्रारीची दखल कधी घेतल्या जाईल हे महापालिका आयुक्तांनी एकदा सांगावे अशी नागरीकांची अपेक्षा आहे. सातत्याने होत असलेल्या तक्रारीमुळे गेल्या १२ तारखेला कारवाईची नौटंकी अतिक्रमण विभागाकडून करण्यात आली. थातुर मातुर काम करुन अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेले पथक आल्यापावली परत गेले. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याचे नाटक न करता नागरीकांची आणि करदात्यांची अडचण लक्षात घेता पोस्टल कॉलनीतील अतिक्रमणाची महापालिकेने घ्यावी एवढीच माफक अपेक्षा नागरीकांची आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

# आलेगाव बाभुळगाव मळसुर रस्त्यावर व कडेला शेकडो खड्डे; प्रवासी, वाहन चालक हैराण

प्रतिनिधी २० डिसेंबर

**आलेगाव :** आलेगाव बाभुळगाव मळसुर वाहतूक रस्त्यावरील डांबर अती पावसामुळे, वाहून गेल्याने सदर रस्ता वाहन चालकासह प्रवाशांना जीवघेणा बनला आहे. संबंधित प्रशासनाने पुलाजवळील खड्ड्यांमध्ये डांबरीकरण करणे गरजेचे असताना खड्ड्यांमध्ये थातूरमातूर मुरूम भरून मलम पट्टी करण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास धोक्याचा कायमच असल्याचे चित्र आहे.

पातूर तालुक्यातील बाभुळगाव ते आलेगाव आणि आलेगाव ते मळसूर रस्ता अती वाहतुकीचा असून सदर रस्त्यावरून शाळा, कॉलेज चे विद्यार्थी तसेच व्यापार निमित्ताने असंख्य व्यापारी आणि शेकडो प्रवाशांची रेलचेल असते. तसेच चांनि पोलिसांना मळसूर मार्गे आलेगाव येथे सुरक्षा, पेट्रोलिंग निमित्ताने याच मार्गाने यावे लागत असते परंतु सदर मार्गावर भयंकर खड्डे असल्यामुळे, वेळेचे बंधन पाळणे कठीण होत असल्यामुळे बरेच वेळा पोलिसांना सुरक्षा, पेट्रोलिंग करीता कठीण होत असल्याचे समोर आले आहे. तसेच गेल्या काही वर्षांपासून बाभुळगाव ते आलेगाव रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून जागोजागी मोठमोठे खड्डे पडून रस्ता प्रवाशांसह वाहन चालक यांच्या करीता जीवघेणा बनला आहे. तसेच निर्गुणा नदीवरील पुलावरील सुरक्षा कठडे, तसेच रस्त्याखालील मातीचा भराव या वर्षीच्या पुराच्या



तडाख्याने पाण्यात वाहून गेल्याने प्रवाशांची सुरक्षाच धोक्यात आली आहे. या घटनेला जवळपास तीन महिन्याचा कालावधी उलटून गेला परंतु अद्याप पावेतो संबंधित प्रशासना कडून थातूरमातूर खड्डे भरण्याशिवाय कामच झाले नसल्यामुळे, सदर रस्त्यावरून वर्दळ असणारे विद्यार्थी, प्रवासी, व्यापारी, शेतकरी शेतमजूर, पोलिस प्रशासन आदींना जीवधोक्यात घालवून आपला प्रवास पूर्ण करीत आहेत.

# अकोट परिसरातील जिओ टॉवर नेटवर्कचा वाजला बोजवारा

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोटः** तालुक्यामधील जिओ नेटवर्क कव्हरेज टॉवरचा ४ ते ५ महिन्यापासून संपूर्ण ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात नाहक महिन्याकाठी रिचार्ज खर्च करून सुद्धा त्रास सहन करावा लागत आहे पदवीधर शालेय विद्यार्थी व इतरही गावांमध्ये जिओ मोबाइल नेटवर्कचे कव्हरेज नाहीसे झाले आहे सतत कॉल ड्रॉप होणे ,नेटवर्क उपलब्ध नसणे, इंटरनेटचा वेग अत्यंत मंद झाला आहे. जिओ फायबर कनेक्शनचा वापर करीत असून त्यांनाही इंटरनेट स्लो असणे वारंवार कनेक्शन खंडित होणे तसेच सेवा व्यवस्थित नाही असा आरोप आहे.

राहणापूर येथील बळीराम मावसकर यांचा मुलगा मरण पावलाअसता त्यांना बाहेर गावात परिवारातील व इतरांनाही माहिती देण्याकरता भयंकर त्रास सहन करावा लागला. अखेर फोन न लागल्यामुळे संस्कार दुसऱ्या दिवशी करावे लागले. संतप्त नागरिकांनी अकोट मधील जिओ नेटवर्क कंपनीच्या ऑफिसला नेटवर्क मॅनेजर हर्षद खरबडे यांना तक्रारी देऊन सुद्धा कोणतीच उपाय योजना नाही. तुमचे सिम कार्ड बदलून टाका आम्हाला काही देणे घेणे नाही असे कर्मचारी उद्धट भाषेत वागणूक देत आहेत. कंपनीकडून ग्राहकांची फसवणूक होत आहे. दादागिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी अशी आदिवासी भागातील राहणापूर येथील नागरिकांची जोर धरत आहे,. यावेळी बोर्डी तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब ताडे यांनी आजपर्यंत फाईव्ह जी नेटवर्क महागडा खर्च करून सुद्धा नागरिकापर्यंत पोहोचले नाही. उलट त्यांचा त्रास वाढतच आहे. देऊळगाव भूषण गावंडे, सागर गहले, वडाळी देशमुख डॉ.मंगेश अंबडकार, शुभम वाहूरवाघ, रहानापूर अनुप ढोक, नासिर खरते, समीर ,ज्ञानेश्वर आंधळे पो.पा. बाजीराव मुंडे, संजय मावसकर, मोठ्या संख्येने तक्रारकर त्यांनी यावेळी कार्यालयावर उपस्थिती लावली.



देऊळगाव येथील दोन महिन्यापासून जिओ टावर रेंज प्रॉब्लेम असून शैक्षणिक विद्यार्थ्यांचा इतरही नागरिकांना त्रास जिओ टावरचे चे कार्य शून्य झाले आहे. तक्रारी देऊन उडवा-उडवीची उत्तरे देतात.

**सौ. पूजा गहले,** देऊळगाव सरपंच

बोर्डी गावातील जिओ नेटवर्कचा भयंकर त्रास वाढता आहे तोंडी ऑनलाईन व लेखी तक्रार देऊन सुद्धा कारवाई शून्य सात हजार लोकसंख्या असून फाईव्ह जी नेटवर्क पासून वंचित आहोत लाखो रुपयाचा उदंड जनतेला बसत आहे.

**बाळासाहेब ताडे,** बोर्डी तंटामुक्ती अध्यक्ष

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५

## बिबट्याचा इसमावर हल्ला; पोफाळी परिसरात दहशतीचे सावट

प्रतिनिधी २० डिसेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील पोफाळी परिसरात वन्यजीवांचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोफाळी येथील रहिवासी शंकर ज्ञानबा खंदारे यांच्यावर कळमुला नाल्याजवळ सायंकाळी चार ते पाचच्या सुमारास बिबट्याने हल्ला केल्याची घटना समोर आली असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

पाण्याच्या शोधात जंगलातील वन्यजीव गावकुसाबाहेर येत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. पोफाळी, कळमुला, अंबाळी, जनुना, पळशी, नागापूर, नागवाडी, पाथरवाडी, शेनंद, सावरगाव (बंगला), धनज, मोहदरी व तरोडा आदी गावांच्या शिवारात बिबट्याचा वावर असल्याची माहिती ग्रामस्थांकडून दिली जात आहे. काही ठिकाणी जनावरांवर हल्ल्याच्या घटनाही घडल्याचे समजते. रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत शेतात जावे लागत असताना, बिबट्याच्या वावरामुळे ही बाब धोकादायक ठरत आहे.

# नगराध्यक्ष व नगरसेवकांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद

प्रतिनिधी २० डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी नऊ उमेदवार रिंगणात असून, २९ प्रभागांमध्ये ५८ नगरसेवक पदांसाठी २९९ उमेदवार मैदानात आहेत. शनिवारी सकाळपासून शहरातील २४८ मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान सुरु झाले आणि सर्व उमेदवारांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद झाले आहे.

## रविवारी मतमोजणी; कोण होणार विजयी?

नगराध्यक्ष पदासाठी थेट मतदान करणाऱ्या २,३२,३१५ मतदारांच्या हातात आज निर्णय आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या नऊ उमेदवारांचे भविष्य ईव्हीएममध्ये अडकले आहे, तर २९९ नगरसेवक पदांच्या उमेदवारांचे नशीबही याच मतांवर अवलंबून आहे. यवतमाळसह जिल्ह्यातील दिग्रस, पांढरकवडा, वणी आणि इतर नगरपरिषदांसाठीही मतदान आज पार पडले.

प्रशासनाने मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली.

विशेषतः अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव असलेल्या नगराध्यक्षपदासाठी नऊ उमेदवार रिंगणात असल्यामुळे या जागांसाठी स्पर्धा अधिक गहन होती. यवतमाळ व्यतिरिक्त दिग्रस पालिकेतील २-ब, ५-ब, १०-ब, वणी पालिकेतील १४-क, पांढरकवडा पालिकेतील ८-अ आणि ११-ब या जागांसाठीही मतदान प्रक्रिया पार पडली. प्रशासनाने सुरळीत मतदानासाठी सुरक्षा, वाहतूक आणि कर्मचारी व्यवस्थापनाची विशेष तयारी केली होती. मतमोजणी २१ डिसेंबर रोजी रविवारी होणार असून, यामध्ये नगराध्यक्ष पदासह २९ प्रभागांतील ५८ नगरसेवकांचे नशीब ठरवले जाईल. यवतमाळसह जिल्ह्यातील नेर, पांढरकवडा, वणी, दिग्रस, आर्णी, दारव्हा, पुसद, घाटंजी, उमरखेड या नगर परिषद आणि ढाणकी नगर पंचायतची मतमोजणीसह निकाल जाहीर होणार आहे. जिल्हा प्रशासनाने निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी प्रत्येक केंद्रावर योग्य तयारी केली असून, मतमोजणीसाठी सुरक्षा आणि तज्ज्ञ कर्मचारी तैनात केले आहेत. शहरातील राजकीय वातावरण उत्साही असून, मतदार आज त्यांच्या नेतृत्वासाठी निर्णायक भूमिका बजावणार आहेत. अखेर, रविवारी २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार असून, कोण विजयी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






## प्रभाग २७ मध्ये ईव्हीएम बिघाड

प्रतिनिधी २० डिसेंबर

**यवतमाळ :** नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक २७ मधील ध्रुव प्राथमिक शाळा या मतदान केंद्रावर तांत्रिक बिघाडामुळे मतदान काही वेळा बंद राहिले आहे. खास करून खोली क्रमांक ५ मधील ईव्हीएममध्ये तांत्रिक अडथळा निर्माण झाल्याने सुमारे वीस मिनिटे मतदान थांबले आहे. यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मतदारांची रांग उभी राहिली आहे.

प्रशासनाचे कर्मचारी ताबडतोब घटनास्थळी पोहोचले असून, ईव्हीएम दुरुस्ती किंवा पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मतदारांनी संयम राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, मतदान सुरळीत पार पडण्यासाठी इतर खोल्यांमध्ये प्रक्रिया सुरु ठेवण्यात आली आहे, ज्यामुळे संपूर्ण प्रभागातील मतदानावर फारसा परिणाम होणार नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. यवतमाळमध्ये एकंदर २४८ मतदान केंद्रांवर मतदान सुरू असून, प्रशासनाने सुरळीत मतदानासाठी सुरक्षा आणि व्यवस्थापनाची विशेष तयारी केली आहे.




## २९ फेऱ्यांतून उलगडणार निकालाचे चित्र

प्रतिनिधी २० डिसेंबर

**यवतमाळ :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा निकाल २१ डिसेंबर रोजी तब्बल २९ फेऱ्यांतून उलगडणार आहे. मतमोजणी शासकीय तंत्रनिकेतन, धामणगाव रोड येथे सकाळी १० वाजता सुरू होईल. प्रभाग क्रमांक १ पासून प्रभागनिहाय (एकावेळी एक संपूर्ण प्रभाग) मतमोजणी होणार असून, प्रत्येक फेरीची घोषणा तात्काळ केली जाईल.

मतमोजणीसाठी १३ टेबल्स लावण्यात आले आहेत, तर एक टेबल राखीव आणि टपाली मतांसाठी स्वतंत्र टेबल अशी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ९:४५ वाजता ईव्हीएम ठेवलेले सुरक्षा कक्ष उघडले जाईल. उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी सकाळी ९ वाजेपूर्वी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

प्रशासनाने कडक नियमावली लागू केली असून, मतमोजणी कक्षात फक्त ओळखपत्र असलेल्या उमेदवार किंवा त्यांच्या एका प्रतिनिधीलाच प्रवेश मिळेल. मोबाईल फोन, कॅमेरा पूर्णपणे प्रतिबंधित असून, तंबाखूजन्य पदार्थ सोबत आढळल्यास किंवा गोंधळ घातल्यास कायदेशीर कारवाई होईल, असे स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

विदर्भातील महत्त्वाच्या नगर परिषदांपैकी एक असलेल्या यवतमाळमध्ये राजकीय पक्षांमध्ये चुरस असल्याने २९ फेऱ्यांच्या या लांबलचक प्रक्रियेकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

प्रशासन मतमोजणी शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.





**वयाला हरवून लोकशाहीचा आदर्श**

नगर परिषद निवडणुकीत वॉर्ड क्रमांक 20 मधील 85 वर्षीय सरिता भीष्म यांनी उत्साहाने मतदान करत नागरिकांना प्रेरणा दिली.
**(छायाचित्र : प्रसाद नायगावकर, यवतमाळ)**



## एक नगरपंचायतसह ९ नगर परिषदही मतमोजणीसाठी सज्ज








प्रतिनिधी २० डिसेंबर

**यवतमाळ :** जिल्ह्यातील ९ नगर परिषद व एक नगरपंचायतमध्ये दि. २ डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडली आहे. यामध्ये पुसद, वणी, उमरखेड, दिग्रस, पांढरकवडा, दारव्हा, घाटंजी, नेर-नबाबपूर, आर्णी नगरपरिषद व ढाणकी नगरपंचायतच्या निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी रविवारी होणार आहे.

प्रभागनिहाय मतमोजणी होणार असून, त्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात केला आहे.

## भास्करा रोहिणीच्या रूपाने हदगाव तालुक्यात सूर्योदय झाला

प्रतिनिधी २० डिसेंबर

**वसंत देशमुख**

**उमरखेड (ता.प्र.) :** हदगाव तालुक्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जन्माला आलेला एक सर्वसामान्य गोरगरीब घराण्यातून समाजसेवेची कास धरून गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी समाजसेवेची कास धरली तीन वेळा आमदार व एक वेळा खासदार म्हणून नावारूपाने आलेली अशी ती व्यक्ती सुभाषराव वानखेडे यांनी सामाजिक जीवनाशी बांधिलकी जोपासताना त्यांनी पक्षाचा विचार न करता मला माझ्या समाजाला समोर येण्याकरिता पक्ष जरी बदलावे लागले असतील तरी मी ते बदलणार कारण आज माझा बहुसंख्याकी मराठी बांधव शेतकरी कामगार यांच्या उस्थानाकरिता मी वेळोवेळी आपली भूमिका बदलली असली तरी आजही माझा मराठमोळा समाज बांधव या व यांच्या आशीर्वादाने मी आज समाज सेवेसी प्रामाणिकपणे कार्य करीत असतो व करत आहे. त्यामुळे मी माझ्या स्नुशालाती उच्चशिक्षित सॉफ्टवेअर इंजिनियर असून तसेच ( ती एक संगणक अभियंता असून )तिने समाजसेवीशी कास धरून आपल्या सदर संगणक तज्ञ अभियंता पदाला त्याग करून समाजसेवेची कास धरली यावरूनच सदर कुटुंबाचे समाजाप्रती असलेले योगदान समाजात दिसून येते.सदर रोहिणी ह्या उच्चशिक्षित असून ऐतिहासिक रूत्या सदर रोहिणी नावाच्या शब्दाचा उल्लेख वेळोवेळी आपल्या इतिहासामध्ये समाविष्ट झाला असून सदर रोहिणी नावाची व्यक्ती ही दक्ष प्रजा प्रतीच्या 27 व्या कन्या होत्या.

त्यामुळे आयोगाने सदर दक्ष प्रजापतीच्या कार्याला अनुसरून एक आयोग अलीकडच्या काळात ओबीसी समाजासाठी व उपवर्गीय अभ्यास करण्याकरिता स्थापन केला. त्यामध्ये रोहिणी शब्द चर्चेत आला तसेच दिल्लीमध्ये रोहिणी परिसर म्हणून अत्यंत लोकप्रिय असलेले प्रसिद्ध ठिकाण असून नक्षत्र व त्या अर्थाने रोहिणीचा या रोहिणी शब्दाचा अभ्यास करण्याकरिता हा शब्द वापरला जातो त्यामुळेच अभ्यासू वृत्तीच्या असलेल्या रोहिणी यावेळेस हदगाव नगरपालिकाच्या अध्यक्ष पदावर विराजमान होऊन त्या ठिकाणी एक नक्षत्र रुपाने सदर विभागाचा विकास करून आपले नाव नक्षत्र रुपी याप्रमाणे झळकवतील याबद्दल कुणाचेही दुमत नसावे.

## उमरखेड नगरपालिका निवडणुकीत जनशक्ती विरुद्ध धनशक्तीचा थरार


प्रतिनिधी २० डिसेंबर











**उमरखेड :** उमरखेड नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाची दीर्घकाळाची सत्ता टिकवण्यासाठी किंवा विरोधी युतीला सत्तेत प्रवेश मिळवण्यासाठी जोरदार संघर्ष सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपाची मजबूत पकड असलेल्या या नगरपालिकेत यंदा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि काँग्रेस यांची 'जनशक्ती' युती भाजपाला आव्हान देत आहे. मात्र, शहरातील युवक, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसह बहुसंख्य नागरिकांच्या भावना भाजपाच्या बाजूने असल्याचे चित्र दिसते.

निवडणूक प्रचारादरम्यान 'जनशक्ती' युतीने साम-दाम-दंड-भेद अशा विविध नीती अवलंबल्या, तरीही भाजपाच्या कमळ चिन्हाला प्राधान्य मिळेल, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत. "यावेळेसही भाजपाच सत्ता कायम ठेवेल आणि विरोधी युतीला प्रवेश मिळणार नाही," असे अनेकांनी सांगितले. काही प्रस्थापित नेत्यांनी नगरपालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आटापिटा केला, तरी जनतेचा कौल भाजपाकडेच राहील, असा विश्वास व्यक्त होतो.

विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेला यंदा किमान चार-पाच जागा मिळवून इतिहास घडवण्याची चर्चा आहे. दुसरीकडे, एमआयएमने अनेक उमेदवार उतरवले असून, मुस्लिम बहुसंख्य मतदारांचा पाठिंबा मिळवण्यात त्यांना यश मिळत असल्याने काँग्रेसला चारही बाजूंनी धोका निर्माण झाला आहे.

उमरखेड नगरपालिकेत एकूण १३ प्रभागांतील २६ जागांसाठी १३२ उमेदवार रिंगणात आहेत. मतदान २ डिसेंबरला पार पडले असून, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मतमोजणी आणि निकाल उद्या, २१ डिसेंबरला जाहीर होणार आहेत. येणारा काळच सांगेल, कमळ पुन्हा फुलणार की जनशक्तीला यश मिळणार!

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी महागांव जिल्हा यवतमाळ यांचे कार्यालय, महागांव.**

**जाहिरनामा**

त्या अर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार (नामे) श्री. विनोद परसराम चव्हाण रा. तुळशिनगर पो. काळी दौ. ता. महागांव जि. यवतमाळ त्यांनी त्यांचे नाते मुलगी (नामे) श्री/सौ कु. दिपाली विनोद चव्हाण रा. तुळशिनगर पो. काळी दी. ता. महागांव जि. यवतमाळ यांच्या जन्म नोंदणी बाबत कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहीर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वत: अगर आपले वकिला मार्फत हजर राहून आपली हरकत अथावा अक्षेप लेखी स्वरूपात नोंदवावा अन्यया कोणालाही काहीही सांगायचे नाही असे गृहित धरून संदर अर्ज दाराचा अर्ज निकाली काडण्यात येवून त्यांना जन्म नोंद मिळणे बाबतचे आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १४.११.२०२५ रोजी माझया सहीने व शिक्यानिशी प्रसिद्धी करण्यात येत आहे.

(शिक्का)
**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

**महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव**
Email id- tgp.mahagoan@gmail.com
दुरध्वनी क्रमांक 07236-222238
क्रमांक/म.स./जन्म नोद/कावि/403/2025
दिनांक 13/11/2025

**जाहीर नोटीस**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अर्जदार नामे विशाल संतोष चिभडे रा.गुंज महागांव यांनी त्यांच्या आजोबा: करीता नामे जयवंत अर्जुन चिभडे यांचा गुंज येथे दि. 17/04/2021 रोजी मृत्यू झाला आहे, परंतु त्यांचे मृत्यूची नोंद सचिव. ग्रा.पं. गुंज / नगरचपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र मृत्यु नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नुसार सचिव.ग्रा.पं. गुंज / नगरचपंचायत, महागांव यानी तिच्या मृत्यूची नोंद घेण्याबाबत आदेशित करणेबाबतचे प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते कि, सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदार याची आजोबाच्या / मृत्यूची नोंदणी आपले अभिलेख रजिष्टरला पडताळणी करून संबधीत व्यक्तीची मृत्यूची नोंद आहे किंवा कसे? तसेच सदर व्यक्तीचा मृत्यू कुठे व कधी झाला याबाबत चौकशी करून आवश्यक दस्तऐवजासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा. सदर आपले अहवाला अभावी प्रलंबित राहील्यास सर्वस्वी आपली जबाबदारी राहील यांची नोंद घ्यावी.

(शिक्का)
**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. २० डिसेंबर २०२५



















# उमेदवारांचे भाग्य, मशीनमध्ये बंद !

## *दुपारपर्यंत सरासरी ५५ टक्के मतदान *उद्या २१ डिसेंबरला फैसला

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

नगर परिषदेच्या उमेदवारांचे भवितव्य इलेक्ट्रॉनीक मतदान यंत्रात आज बंद होत आहे . दुपारपर्यंत सरासरी ५५ टक्के मतदान झाले होते. त्यांच्या भाग्याचा फैसला २१ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे मतदानाबरोबरच काऊन-डाऊन ला सुरूवात झाली आहे.

या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज की रात कत्तल की रात समजून उमेदवार मतदारांचा कौल आपल्याकडे वाढविण्यासाठी विविध युत्त्या लढविल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत वाशीम येथे उमेदवार उभे आहे. तर उमेदवार आपले भाग्य आजमवणार आहे. उमेदवारांची दमछाक होत आहे.अनेक भागात उमेदवार प्रत्यक्ष पोहचू शकले नाही. नगर पालिका निवडणुकीत विजयाच्या गावापर्यंत पोहोचण्यासाठी बहुतांश पक्षाच्या उमेदवारांनी कंबर कसली होती. साम, दाम, दंड व भेद या चतुसुत्रीचा वापरही यासाठी करण्यात येत असून, प्रत्येक राजकीय पक्षांतील नाराज कार्यकर्त्यांना आपल्याकडे खेचून तालुक्यात



आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न मुरब्बी उमेदवारांकडून केला गेला. पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातींच्या खुंट्याला बांधल्या गेली आहेत. सत्तेच्या सारिपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात 'कास्ट फॅक्टर' फार महत्वाचा असतो जातीय मताच्या आधारेच सेटींग सुरू होती.

निवडणूक आयोगाने यावेळी कोणताही मतदार हा निवडणुकीपासून वंचित राहू नये यासाठी प्रत्येक मतदार संघात जनतेमध्ये मतदानाविषयी जनजागृती करून मतदान करणे हा राष्ट्रीय हक्क असल्याचे सांगून प्रत्येक ठिकाणी या विषयी रॅली काढून मतदानाचे महत्व मतदारांना पटवून दिले आहेत. नगर पालिका निवडणूकत जास्तीत जास्त मतदार मतदानाचा हक्क बजावतील असे दिसून येते. मतदान केंद्रावर कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## उमेदवारांनी दिल्या मतदान केंद्राला भेटी

मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळण्यासाठी जंग-जंग पछाडणाऱ्या विविध दिग्गजाचे आज भवितव्य मिशनमध्ये बंद झाले. त्यांच्या भाग्याचा फैसला २१ डिसेंबरला लागणार आहे. या निवडणुकीसाठी प्रशासनाच्या वतीने सर्व तयारी पुर्ण झाली आहे. प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी मतदान केंद्राला भेटी दिल्या. शांतता व सुव्यवस्था रहावी यासाठी पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मतदान केंद्राला भेटी दिल्या आहेत.



# मतदारांनो, ५ हजारांत नका विकू, अडीच लाख वाचवून टिकू !

## *लोकशाहीच्या उत्सवात मतदारांची जबाबदारी *आम आदमी पार्टीचे आवाहन भारी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

२० डिसेंबर रोजी वाशिम नगर परिषदेचे मतदान होणार आहे. या निवडणुकीत मतदारांना भुलवण्यासाठी विविध आमिषे दाखवली जात आहेत. मात्र, यंदाची निवडणूक केवळ उमेदवार निवडण्याची नसून ती आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याची संधी आहे. '५ हजारात स्वतःला विकू नका, तर आम आदमी पक्षाला मतदान करून ५ वर्षांत अडीच लाखांची बचत करा,' असे आवाहन आम आदमी पार्टीच्यावतीने करण्यात आले आहे.

### बदलाची आली वेळ, राजकारण्याचा करा खेळ

भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या ५ हजार रुपयांच्या आमिषाला बळी न पडता, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य देणाऱ्या पारदर्शक प्रशासनाची निवड करणे ही काळाची गरज आहे. 'तुमचे एक मत तुमच्या कुटुंबाचे भविष्य ठरवणार आहे. त्यामुळे ५ हजारात मत विकण्यापेक्षा अडीच लाख वाचवण्याचा पर्याय निवडा,' असे आवाहन आम आदमी पार्टीच्यावतीने करण्यात आले आहे.

निवडणुकीच्या काळात एकदाच मिळणारे ५,००० रुपये हे क्षणिक असतात. परंतु, जर आपण योग्य आणि विकासभिमुख राजकारणाची निवड केली, तर दरवर्षी होणारी बचत आपल्या आयुष्याचा कायापालट करू शकते. आम आदमी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावानुसार, पारदर्शक कारभारामुळे एका कुटुंबाची वार्षिक ५०,००० रुपयांपर्यंत बचत होऊ शकते. घरपट्टी व पाणीपट्टी माफीमुळे सर्वसामान्य कुटुंबाचे वर्षाला अंदाजे ५,००० रुपये वाचतील. दर्जेदार शिक्षणामुळे सरकारी शाळांचा दर्जा खासगी कॉन्व्हेंटसारखा झाल्यास, एका पाल्याचे २०,००० तर दोन पाल्यांचे वर्षाला ४०,००० रुपये वाचू शकतात. उत्तम आरोग्य सुविधांमुळे मोफत आणि उत्तम आरोग्य सुविधांमुळे औषधोपचारांवर होणारा वर्षाचा किमान ५,००० रुपयांचा खर्च वाचेल. अशा प्रकारे, एका वर्षाची ५०,००० रुपयांची बचत म्हणजे ५ वर्षांच्या कार्यकाळात तब्बल २,५०,००० (अडीच लाख) रुपयांचा थेट फायदा प्रत्येक कुटुंबाला मिळू शकतो.

# मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज !

## ५३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती *२३० पोलिस बंदोबस्त; ३ एस आरपीएफ सेक्शन



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम नगरपरिषदसाठी आणि रिसोड, प्रभाग ५ ब आणि प्रभाग १० अ निवडणुकीसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदान प्रक्रिया सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत पार पडणार असून मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, स्वयंसेवकांची मदत, शौचालये तसेच दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअर आणि रॅम्प उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू असून पाच व्यक्तींपेक्षा अधिक जमावास मनाई करण्यात आली आहे.

मतदारांना मतदान केंद्राची माहिती https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर नाव किंवा इंग्ध क्रमांकाद्वारे मिळू शकते तसेच 'मताधिकार' या ॲपमध्येही माहिती उपलब्ध आहे. निवडणूक कामकाजासाठी वाशिम ३९ आणि रिसोड २१ शासकीय व खाजगी वाहने अधिग्रहित करण्यात आलेली आहेत.

शांततेत मतदान पार पाडण्यासाठी चोख बंदोबस्त तैनात असून वाशिम नगरपरिषदसाठी पोलीस उपधीक्षक एक पोलीस निरीक्षक २, सहाय्यक पोलीस निरीक्षक /पोलीस उपनिरीक्षक १३ अंमलदार १७९, होमगार्ड १६० , २ एस आरपीएफ सेक्शन तैनात असणार आहे. रिसोड नगर परिषद क्षेत्रात पोलीस उपअधीक्षक १ , पोलीस निरीक्षक २, उपनिरीक्षक ४, अंमलदार ६९, ६० होमगार्ड व १ एसआरपीएफ सेक्शन तैनात करण्यात आली आहे.

**मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी**

राज्य शासनाने मंगळवार, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सुट्टी वाशिम जिल्ह्यातील , वाशिम व रिसोड नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात लागू केली.अशी अधिसूचना दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आली आहे.तसे कामगारांना देखील भरपगारी सुट्टी मतदानासाठी मिळणार आहे.मालेगाव नगरपंचायतीत एकूण मतदार मतदार नोंदणीकृत आहेत. एकूण मनुष्यबळात वाशिम नगरपरिषदसाठी ५०० अधिकारी व कर्मचारी आणि रिसोड नगरपरिषद प्रभागासाठी ३५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

**एकूण मतदार, मतदान केंद्रे :**

वाशिम नगरपरिषदसाठी एकुण ७५ हजार ७० मतदार आहेत. यामध्ये पुरुष ३८ हजार ५२२, महिला ३६ हजार ५४१, मतदान केंद्र ८१, इमारती ३०, प्रभाग १६ रिसोड नगरपरिषद प्रभाग ५ ब आणि १० अ या दोन प्रभागासाठी २ इमारतीत ५ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. एकूण मतदार ४ हजार २२३ असून यामध्ये पुरुष २ हजार २११ ,महिला २ हजार १२ मतदारांचा समावेश आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


# बाळापुर नगर परिषदेसाठी शांततेत मतदान सुरु

प्रतिनिधी २० डिसेंबर

**बाळापूर :** बाळापूर नगर परिषदेची निवडणूक प्रक्रिया शनिवारी सकाळी ७.३० वाजतापासून शांततेत सुरू आहे. सुरूवातीला थंडीमुळे मतदानाचा वेग मंद होता. सकाळी ११.३० वाजेपर्यंत २२.६९ टक्के मतदान झाले होते.

बाळापूर न.प.च्या १२ प्रभागातील २५ वार्डासाठी ही निवडणूक होत असून, यासाठी ५ नगराध्यक्षांसह १८५ नगरपरिषदेचे उमेदवार आहेत. बाळापूर नगर परिषदेची निवडणूक लांबल्यामुळे नागरिकांमध्ये या निवडणुकीबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली होती. आता मतदान सुरू झाले असून, दुपारनंतर मतदानाचा वेग वाढणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

### असे आहेत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

अकिलाबी मो. अनिस एमआयएम ,डॉ. आफरिन परविन कॉग्रेस ( महाविकास आघाडी),धनश्री चैतन्य अंबाडे भाजपा (महायुती),रजिया बेगम खतिब (सैयद) वंचित (नगर विकास आघाडी),जकियाबी बिसमिल्ला खान अपक्ष

# न.प., न.पं.ची उद्या मतमोजणी

- ३८ नगराध्यक्षांसह ७८० नगरसेवकांच्या भाग्याचा होणार फैसला
- प्रशासन सज्ज; मतमोजणी केंद्राला येणार यात्रेचे स्वरूप

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोला :** जिल्ह्यातील ५ नगर परिषदा आणि एका नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे ३८ नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांसह ७८० नगरसेवक पदाच्या उमेदवारांमध्ये धाकधूक वाढली आहे. या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज झाले असून, उद्या मतमोजणी केंद्राला यात्रेचे स्वरूप येणार आहे. जिल्ह्यात बार्शिटाकळी नगर पंचायतसह अकोट, तेल्हारा, हिवरखेड आणि मूर्तिजापूर नगर परिषदसाठी २ डिसेंबरला निवडणूक प्रकिया पार पडली होती.

यामध्ये बाळापूर नगर परिषदेची निवडणूक लांबल्यामुळे ती २० डिसेंबरला घेण्यात आली. त्यामुळे पाच नगरपरिषद व एका नगरपंचायतीची मतमोजणी २१ डिसेंबरला ठेवण्यात आली होती.

### अशा आहेत नगरसेवकांच्या जागा व उमेदवार

अकोट ३५ जागा १८७ उमेदवार ,मूर्तिजापूर २५ जागा १३० उमेदवार ,तेल्हारा २० जागा ९२ उमेदवार, हिवरखेड २० जागा ९९ उमेदवार, बार्शीटाकळी १७ जागा ९२ उमेदवार, बाळापूर २५ जागा १८५ उमेदवार,एकूण २०२ जागा ७८० उमेदवार

### उमेदवारांसह नागरिकांना निकालाची उत्सुकता

- काही अपवाद वगळता निवडणुकीची प्रक्रिया शांततेत पूर्ण झाल्यानंतर व २० डिसेंबरला लांबलेली बाळापूर न.प.ची निवडणूकही पार पडली. त्यामुळे उमेदवारांसह नागरिकांची नजर आता २१ डिसेंबरच्या निकालाकडे लागली असून, उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### उमेदवारांना करावी लागली दीर्घ प्रतीक्षा

- २ डिसेंबर रोजी मतदान झाल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी मतमोजणीची प्रक्रिया पार पडते. मात्र यंदा उमेदवारांना २१ डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे उमेदवारांची उत्कंठा दिवसेंदिवस ताणली जात होती. अखरे आता तो दिवस जवळ आल्याने उमेदवारांची प्रतीक्षा संपणार आहे.

### तेल्हारा नगरपंचायत (अनुसूचित जाती महिला)


नगराध्यक्ष पदाचे एकूण उमेदवार (५)



शिवानी सचिन थाटे – शिवसेना (उबाठा)
राजकन्या मधुकर पवार – राकाँ. (अजित पवार गट)
वैशाली जितेंद्र पालीवाल – भाजपा
विद्या सिद्धार्थ शामस्कर – वंचित बहुजन आघाडी
दीपा महेश सिसोदिया – शिवसेना (शिंदे गट)

### बार्शिटाकळी नगरपंचायत (सर्वसाधारण महिला)

नगराध्यक्ष पदाचे एकूण उमेदवार (५)




अख्तर खातून अलिमुद्दीन – वंचित बहुजन आघाडी
दीपमाला संजय मुळे – शिवसेना (उबाठा)
कोकीळाताई श्रीराम येळवणकार – भाजप
रूपाली अतुल गोल्डे – शिवसेना (शिंदे गट)

### अकोट नगर परिषद (नामाप्र महिला)

नगराध्यक्ष पदाचे एकूण उमेदवार (८)




अलका संजय बोडखे – कॉंग्रेस
माया विवेक धुळे – भाजपा
विजया मनोहर चौधरी – शिवसेना (उबाठा)
चंचल सुनील पितांबरवाले – शिवसेना (शिंदे गट)



स्वाती मंगेश चिखले – वंचित बहुजन आघाडी
सै. फिरोजबी शरीफ – एमआयएम
गाजीयाबानो मोहम्मद बद्रुज्जमा – राकाँ (अजित पवार गट)

### मूर्तिजापूर नगर परिषद (सर्वसाधारण)

नगराध्यक्ष पदाचे एकूण उमेदवार (८)



अशोक दुबे – कॉंग्रेस
हर्षल साबळे – भाजपा
विनायक गुल्हाने – शिवसेना (उबाठा)
शुभम राजेंद्र मोहोळ – (शिवसेना शिंदे गट)




इमरान शेख खलील – वंचित बहुजन आघाडी
दीपाली श्याम जाधव – रिपाइं (आठवले गट)
कृष्णराव गावंडे – राकाँ (अजित पवार गट)
सुनील पवार – अपक्ष

### तालुकानिहाय मतमोजणी ठिकाण

- अकोट -शासकीय औद्योगिक संस्था
- मूर्तिजापूर - न.प. इमारत क्र. ४
- बाळापूर - शासकीय धान्य गोदाम खामगाव नाका
- तेल्हारा - डॉ. केशवराव हेडगेवार मंगल सभागृह
- हिवरखेड - शेतकी खरेदी विक्री संस्था
- बार्शिटाकळी - नगर पंचायत कार्यालय

### हिवरखेड नगर परिषद (नामाप्र महिला) नगराध्यक्ष पदाचे एकूण उमेदवार (७)



सुलभा रमेश दुतोंडे – भाजपा
सुनंदा सुरेश गिऱ्हे – कॉंग्रेस
शोभा मधुकर घुंगड – प्रहार शिवसेना
आचल सुरेश ओंकारे – राष्ट्रवादी अजित पवार
कल्पना सुनिल अस्वार – ( वंचित)
साबिया सौदागर – अपक्ष

# मित्तल इलेक्ट्रॉनिक्सचा इयर एंड धमाका इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवर 60 टक्के पर्यंत सूट


प्रतिनिधी २० डिसेंबर




**अकोला:** अकोलेकरांनो, आता घराला स्मार्ट बनवण्याची वेळ आली आहे. मित्तल इलेक्ट्रॉनिक्स घेऊन आले आहेत वर्षातील सर्वात मोठा 'इयर एंड सेल'. स्मार्ट टीव्ही असो वा वॉशिंग मशीन, प्रत्येक खरेदीवर मिळवा ६० टक्क्यांपर्यंत भरघोस सूट मिळणार आहे. सोबतच झिरो डाऊनपेमेंट आणि सुलभ फायनान्सची सुविधा रतनलाल प्लॉटमधील मित्तल इलेक्ट्रॉनिक्स मध्ये उपलब्ध झाले आहे.

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागतानिमित्त अकोलेकरांसाठी खरेदीची सुवर्णसंधी चालून आली आहे. शहरातील नामवंत 'मित्तल इलेक्ट्रॉनिक्स' तर्फे भव्य 'इयर एंड सेल' जाहीर करण्यात आला असून, यामध्ये विविध इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांवर तब्बल ६० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात आहे.

ग्राहकांच्या खिशाचा विचार करून मित्तल इलेक्ट्रॉनिक्सने अत्यंत कमी दरात दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून दिली आहेत स्मार्ट एलईडी टीव्ही ९,९९० पासून, वॉशिंग मशीन ६,९९० पासून, एसी २२,९९० पासून, होम थिएटर ४,९९० पासून उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ग्राहकांसाठी सुलभ हप्त्यांवर फायनान्स सुविधा उपलब्ध आहे.नामांकित कंपन्यांच्या वस्तूंवर आकर्षक डिस्काउंट उपलब्ध करण्यात आला आहे. रतनलाल प्लॉट स्थित मित्तल इलेक्ट्रॉनिक्स च्या मुख्य शोरुमला तुम्ही भेट देऊ शकता. त्याच बरोबर ग्राहक सेवेसाठी अधिक माहितीसाठी मित्तल इलेक्ट्रानिक्स च्या ९८२२५ ७०४०५ मोबाईल नंबरवर कॉल करु शकता.


# जिल्हा परिषद निवडणुका लांबल्याने उमेदवारांचे गणित कोलमडले

कुशल भगत २० डिसेंबर

**कुटासा:** जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याने संभाव्य उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून अनेकांनी क्षेत्रात जोरदार तयारी सुरू केली होती.मतदार संपर्क,गट-तटांची जुळवाजुळव, पक्षांतर्गत चर्चासत्रे, तसेच उमेदवारीसाठी होणारी पडद्यामागची हालचाल या सर्वांमध्ये उमेदवार अक्षरशः गुंतले होते.

निवडणुका जवळ येत असल्याच्या अंदाजावर अनेकांनी प्रचार साहित्य छापण्यापासून सोशल मीडियावर मोहीम राबवण्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर खर्च केला होता. काहींनी गावोगाव सभा घेतल्या. तर काहींनी कार्यकर्त्यांचे वारंवार दौरे करत हवा तयार करण्याचा प्रयत्न केला. परंतु निवडणूक प्रक्रिया स्थगित झाल्याची घोषणा झाल्यानंतर सर्वांचा अंदाज चुकला. स्थानिक पातळीवर आता चर्चा सुरू आहे की पुढील कार्यक्रम काय असेल आणि पक्षांतर्गत नवे समीकरण तयार होईल का. काही उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की निवडणुकीचे वेळापत्रक अचानक थांबवल्याने त्यांच्या महिन्याभराच्या तयारीवर पाणी फिरले.राजकीय वर्तुळात मात्र हे स्पष्टपणे जाणवते की निवडणुका लांबणीवर गेल्याने प्रत्येक गटाला नवी रणनीती आखावी लागणार आहे. मतदार संपर्क टिकवून ठेवणे, कार्यकर्त्यांना बांधून ठेवणे आणि पुन्हा एकदा मोहीम सुरू करण्यासाठी तयारी करणे हे आव्हान आता उमेदवारांसमोर उभे राहिले आहे. हळूहळू वाढत असलेली निवडणूक चुरस काही काळासाठी शांत झाली असली तरी पुढील घोषणा होताच स्पर्धा पुन्हा उफाळून येईल यात शंका नाही.

# गांधी रोडवर हॉटेलमधील सांडपाणी रस्त्यावर परिसराच्या अस्वच्छतेत भर ; नागरिक त्रस्त

प्रतिनिधी २० डिसेंबर



**अकोला:** शहरातील गांधी रोड परिसरात काही हॉटेलमधून रोजच्या वापरातील सांडपाणी रस्त्यावर सोडले जात आहे. नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर साचणाऱ्या पाण्यामुळे दुर्गंधी पसरत असून वाहनचालक व पादचाऱ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याच परिसरात रस्त्यालगत अतिक्रमण पुन्हा वाढल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असून, गर्दीचे स्वरूप दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यामुळे शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व व्यावसायिकांना वेळेत पोहोचणे कठीण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी या समस्येबाबत महापालिकेकडे अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून आरोग्याच्याही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

या परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, महापालिकेने तातडीने सांडपाणी व्यवस्थापनावर नियंत्रण आणावे, अतिक्रमण हटवावे आणि वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बाबींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. लवकरात लवकर उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# आता रोटेशन नुसार नव्हे तर ड्रॉ पद्धतीने होईल महापौर

प्रतिनिधी २० डिसेंबर

## नव्या महापौर पदाच्या आरक्षण सोडतीकडे सगळ्यांचे लक्ष....

**अकोल:** महापालिका निवडणुकीची घोषणा होताच अकोला महानगरपालिका क्षेत्रातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. उमेदवार निवड, युती, आघाडीची गणिते आणि मित्रपक्षांमधील चर्चा सुरू झाल्या आहेत. ९ व्या महापौरपदासाठी कोणता प्रवर्ग राखीव राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी महापौरपदासाठी कोणता प्रवर्ग राखीव राहणार याबाबत विविध अटकळ बांधली जात आहेत. यावेळी रोटेशन पद्धत बंद करण्यात आली आहे. परिणामी, सोडतीच्या माध्यमातून आरक्षण दिले जाईल. यामुळे सर्वांचे अंदाज चुकण्याची शक्यता आहे. आतापर्यंत महापौर हा महानगरपालिकेत सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या पक्षाचा होत होता. यापूर्वी २ नोव्हेंबर २०१९ रोजी ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण ठेवण्यात आले होते. त्यामुळे भाजपच्या अर्चना मसणे अडीच वर्षे सत्तेत होत्या. यावेळी रोटेशन पद्धत बंद करण्यात आली आहे हे उल्लेखनीय आहे. ९ व्या महापौरपदाची निवड २०२६ मध्ये होणार आहे. गेल्या साडेतीन वर्षांपासून महानगरपालिकेवर प्रशासकाची सत्ता आहे. याच कारणास्तव, जानेवारीमध्ये होणाऱ्या महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका आणि त्यानंतर महापौरांच्या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणूक आयोगाने सोमवार, १५ डिसेंबर रोजी महापालिका निवडणुका जाहीर केल्या, परंतु महापौरपदासाठीचे आरक्षण अद्याप जाहीर झालेले नाही. यावेळी महापौरांचे आरक्षण शून्य असल्याने, रोस्टर सिस्टीमऐवजी सोडतीद्वारे आरक्षण दिले जाईल.

यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, सर्वसाधारण महिला आणि खुल्या प्रवर्गासह सर्व प्रवर्गासाठी चिठ्ठ्या टाकल्या जातील आणि काढलेल्या चिठ्ठ्यांच्या संख्येवरून महापौरपदाचे आरक्षण निश्चित होईल.

# शनिदेवांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी!

प्रतिनिधी २० डिसेंबर



**अकोला :** संपूर्ण देशासह अकोला शहरात २० डिसेंबर रोजी मार्गशीर्ष अमावस्या पावन पर्व मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. पितृ तर्पण आणि दान-पुण्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या या अमावास्येला सूर्योदयापूर्वी स्नान करून दीपदान व अन्नदान करणे शुभ मानले जाते. याच पार्श्वभूमीवर, शनिवार असल्याने सकाळपासूनच शहरातील शनि मंदिरांमध्ये धार्मिक अनुष्ठान आणि शनिदेवांच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. पुराणांनुसार, ग्रहांची शांती आणि पितरांना प्रसन्न करण्यासाठी अमावास्येची तिथी अत्यंत शुभ मानली जाते. यामुळेच शहरातील शिव मंदिरांसह शनि मंदिरांमध्ये विविध धार्मिक विधी आणि पूजा-अर्चा करण्यात आली.

# ख्रिस्ती बांधवांकडून ख्रिसमसची तयारी जोरात सुरु

प्रतिनिधी २० डिसेंबर

**अकोला:** ख्रिस्ती बांधव २५ डिसेंबर रोजी नाताळ सण साजरा करणार आहेत. यासाठी शहरात अलायन्स चर्चसह विविध भागातील चर्चचे सुशोभिकरण तसेच रोषणाई करण्यात आली आहे. ख्रिस्ती बांधवांनी सर्वात मोठा सण साजरा करण्यासाठी तयारी सुरु केली आहे. अलायन्स चर्च, माउंट कार्मेल मधील चर्च तसेच बसस्थानकाच्या बाजूचे आणि सिंधी कँप मधील चर्च मध्ये नाताळ सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. शहरातील ख्रिश्चन कॉलेजमध्ये नाताळ सणानिमित्त प्रभात फेरी तसेच विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. समाज बांधवांचा त्यात सहभाग असतो.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK